**महाराष्ट्र शासन**
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई
☎/🖷:- ०२२ २७५७१३३१ Website:www.mahalfa.in E.Mail:ad.report@mahalfa.in

क्र.स्था-१८ /ब/ श्रमदिन / अेअे-१ /११७ दिनांक :- 18 JAN 2013

# आदेश

विषय:- स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयांतर्गत गठीत करावयाची **"श्रमदिन पुनर्विलोकन समिती"**.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाकडून राज्यभरातील विभागीय आणि जिल्हास्तरीय कार्यालयाच्या स्तरावर विविध ग्रामीण आणि नागरी स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणाचे काम केले जाते. ज्या संस्थं ाचे लेखापरीक्षण करावयाचे आहे त्या संस्थांची कार्यपध्दती ज्या नियम , अधिनियम आणि शासन निर्णयानुसार नियंत्रित केली जाते ते नियम व अधिनियम विचारात घेऊन लेखापरीक्षणाचे काम करावे लागते. सदर काम करतांना सन १९९० मध्ये श्रमदिन निश्चितीबाबत समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालानुसार लेखापरीक्षणासाठी श्रमदिन निश्चित करण्यासाठी कायम स्वरुपी निकष ठरविण्यात आले व त्यानुसार लेखापरीक्षण करण्यासाठी विविध संस्थांचे श्रमदिवस ठरविण्यात आले.

सर्व संस्थांचे लेखापरीक्षणासाठी निश्चित केलेल्या श्रमदिवसात जमा पावत्या व खर्चाच्या प्रमाणकांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे श्रमदिनात वाढ करणे गरजेचे आहे. सदर बाब विचारात घेऊन अशा प्रकारच्या सूचना करण्यासाठी व उपाय सूचविण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांची एक समिती गठीत करण्याचे ठरविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने मा.संचालक यांनी दिनांक ८/१/२०१३ रोजी दिलेल्या निर्देशानुसार पुढीलप्रमाणे **"श्रमदिन पुनर्विलोकन समिती"**गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|---|
| १ | श्री.व्ही.बी.तांबडे | सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा,अमरावती | अध्यक्ष |
| २ | श्री .कि.अ.देशपांडे | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, गडचिरोली | सदस्य |

सदर समितीस विचारविमर्षाकरिता इतर सदस्यांची नियुक्ती करता येईल. मात्र अध्यक्षांसह समितीवरील एकूण सदस्यांची संख्या ४ पेक्षा जास्त नसेल. सदर समितीने खालीलप्रमाणे काम करावे-

**अ- बैठकांचा अवधी** - सदर समितीच्या दोन बैठकांमधील कालावधी जास्तीत जास्त १५ दिवसांचा असेल.

**ब- समितीने खालील बाबींबाबत शिफारशी व सूचना कराव्यात :-**

१ प्रचलित श्रमदिनाबाबतच्या आदेशांचे पुर्नविलोकन करणे.

२ सन १९९० मध्यें गठीत झालेल्या श्रमदिन समितीच्या अहवालाच्या निकषानुसार ठरविलेले श्रमदिनांचा आढावा घेणे.

३ सद्य:स्थितीतील विविध संस्थांकडील आर्थिक वर्षातील होणाऱ्या जमा व खर्चाच्या व्यवहाराचा आढावा घेऊन त्याकरिता लेखापरीक्षणास लागणाऱ्या श्रमदिनांचा विचार करुन प्रत्यक्षात लेखापरीक्षणास लागणारे श्रमदिनांचे निकष ठरविणे.

४ श्रमदिन निश्चितीबाबतच्या सुत्रांचा आढावा घेऊन त्यामध्ये बदल आवश्यक असल्यास त्याची फेरनिश्चिती करणे.

५ श्रमदिन निश्चित करताना संगणकावर तयार करण्यात येणा-या AIMS च्या सॉफ्टवेअरमुळे मनुष्यबळात होणारी व लेखापरीक्षणाकरिता श्रमदिनात होणारी बचत इत्यादी सर्व बाबींचा विचार करण्यात यावा.

६ विशेष लेखापरीक्षणाचे श्रमदिन ठरविणेबाबत शिफारशी कराव्यात.